नि.फौ.ख.क्र.२४९/२०२१
शासन–वि– माया मानेकर
नि.क्र. १६

मी शपथेवर खरे सांगते की,

माझे नांव – सौ.रत्नमाला वासुदेवराव बावणकर,
वय अंदाजे ४० वर्ष, कामधंदा– मजुरी,
राहणार– काजळसरा, तह. देवळी, जि. वर्धा.

..................................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी– सरकारी वकील श्री.एस.एस.दुंगे यांच्या मार्फत.**

१. मी आरोपीस ओळखते. ती माझे गावात राहते. घटना दिनांक १५.०२.२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजताचे दरम्यान आम्ही श्री.प्रणित हुस्नापुरे यांचे बटईने केलेल्या शेताच्या धु–यावर घडली होती. त्यावेळी आम्ही शेताचे धु–यावर इंधन ठेवले होते. ते इंधन मी त्याच शेतातून जमा केले होते तसेच हुस्नापुरे यांचे दुस–या शेतातून इंधन विकत घेतले होते. ते शेताचे धु–यावर ठेवलेले होते. बटईने केलेल्या शेतात चना काढणे सुरु होते. त्यावेळी आरोपी मायाबाई तेथे आली व तिने आगपेटीने इंधन पेटवून दिले व दुस–याच्या शेतात निघून गेली. त्यामुळे आमचे रक्कम रुपये १५,०००/– किंमतीचे इंधन जळून नुकसान झाले होते.

२. त्यावेळी माझे पती श्री.वासुदेवराव बावणकर, श्री.मोहनराव हुस्नापुरे, श्री.संजय कानेटकर व इतर बाहेरी गावातील लोक तेथे हजर होते. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेले व त्याठिकाणी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. मला आता फिर्याद व छापील प्रथम खबर दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **P1/PW1, P2/PW1** देण्यात येते. पोलिस आमचेकडे चौकशीसाठी दुस–या दिवशी आले होते. मी पोलिसांना घटनास्थळ दाखविले. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते.

**उलट तपास आरोपीतर्फे – श्री.बी.डब्ल्यू. चौधरी विधीज्ञ यांचे मार्फत**

३. मी फिर्याद देतेवेळी पोलिसांना बटईच्या शेताचे कागदपत्र दिले नव्हते. तसेच मी बटई पत्राची नक्कल पोलीस आले त्यावेळी किंवा फिर्याद देतेवेळी पोलिसांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की गावातील भानगडीमुळे माझे व आरोपीचे पटत नव्हते. आरोपीच्या

शेताचे दस्तऐवज मी पोलिसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की ज्या धु–यावर घटना घडली तो धुरा हुस्नापुरे यांचे मालकीचा आहे हे दाखविण्यासाठी आज रोजी माझेकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीच्या नावाने तेथे शेत नाही. साक्षीदार स्वतः सांगते की तेथे आरोपीच्या आईचे नावाने शेत आहे. हुस्नापुरे व माझे संबंध चांगले आहेत. हे मला माहीत नाही की आरोपी व हुस्नापुरे यांचे आपसात जमत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी हुस्नापुरे व आरोपीच्या शेतामधील धु–यावर मी कोणतेही इंधन ठेवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की दोन्ही शेतांच्या मधे धुरा नाही. हे म्हणणे खरे नाही की श्री.संजय कानेटकर, माझे पती, हुस्नापुरे तेथे हजर नव्हते. माझेकडे जे मजूर तेथे हजर होते याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की हुस्नापुरेच्या सांगण्यावरुन मी खोटा रिपोर्ट आरोपीविरुध्द दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की हुस्नापुरेच्या सांगण्यावरुन मी आज न्यायालयासमक्ष खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृती | माझे समक्ष |
| MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.03.04 17:22:05 +0530 | MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.03.04 17:22:11 +0530 |
| (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) | (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक ०४–०३–२०२६ | वर्धा, दिनांक ०४–०३–२०२६ |